## संपादकीय

# महागाईचा अर्थाग्नी

### घसरता रुपया,महागाई आणि रोजगाराचा प्रश्न

समाजातील अस्वस्थतेकडे प्रामुख्याने राजकीय किंवा सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले जाते. मात्र, अनेकदा या अस्वस्थतेच्या मुळाशी आर्थिक प्रश्न असतात. आरक्षण, पेपरफुटी, मतदार याद्यांची पुनर्रचना किंवा रोजगारातील अनिश्चितता हे प्रश्न आंदोलनाचे तात्कालिक कारण ठरत असले, तरी वाढता खर्च, मर्यादित उत्पन्न आणि भविष्याबद्दलची चिंता यांमुळे असंतोष अधिक तीव्र होतो. त्यामुळे आंदोलनातील घोषणांपलीकडे जाऊन सर्वसामान्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीत महागाई आणि रुपयाचे घसरते मूल्य ही अर्थव्यवस्थेसमोरील महत्त्वाची आव्हाने आहेत. सप्टेंबर २०२६ मध्ये देशातील किरकोळ महागाईचा दर ५.५४ टक्क्यांवर पोहोचला. हा दर रिझर्व्ह बँकेच्या चार टक्क्यांच्या मध्यमकालीन उद्दिष्टापेक्षा अधिक असून, महागाईचा दबाव वाढत असल्याचे त्यातून स्पष्ट होते. अन्नधान्य आणि इंधनाच्या किमतींमधील वाढीचा परिणाम सामान्य कुटुंबांच्या खर्चावर होत आहे.

महागाईवरील दबाव लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेने ऑक्टोबरमध्ये रेपो दरात पाव टक्क्याची वाढ करून तो ५.५० टक्क्यांवर नेला. चार वर्षांतील ही पहिली दरवाढ ठरली. व्याजदर वाढविण्याचा उद्देश महागाईवर नियंत्रण ठेवणे हा असला, तरी त्याचा परिणाम कर्जदारांच्या आर्थिक नियोजनावरही होऊ शकतो. गृहकर्ज किंवा अन्य कर्जांचे व्याजदर बदलल्यास काही कर्जदारांचा हप्ता वाढू शकतो किंवा कर्जफेडीचा कालावधी वाढू शकतो. त्यामुळे महागाई नियंत्रण आणि आर्थिक विकास यांच्यात संतुलन राखणे हे धोरणकर्त्यांसमोरील आव्हान आहे. रुपयाचे डॉलरच्या तुलनेत घसरते मूल्य हीदेखील चिंतेची बाब आहे. भारताला कच्चे तेल आणि अनेक महत्त्वाच्या वस्तू आयात कराव्या लागतात. डॉलर महाग झाल्यास आयातीचा खर्च वाढू शकतो. त्याचा परिणाम इंधन, वाहतूक, उत्पादन आणि अखेरीस ग्राहकांच्या खिशावर होण्याची शक्यता असते. पश्चिम आशियातील संघर्ष, तेलाच्या वाढत्या किमती आणि परकीय गुंतवणुकीतील अस्थिरता यांमुळे रुपयावर दबाव निर्माण झाला आहे. रुपयाचे मूल्य स्थिर ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने डॉलर विक्रीसह विविध उपाय केले आहेत.

परदेशस्थ भारतीयांकडून परकीय चलन आकर्षित करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने एफसीएनआर (बी) ठेवींशी संबंधित विशेष योजना राबवली होती. या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन देशात आले. केंद्र सरकारच्या माहितीनुसार, ऑगस्ट २०२६ पर्यंत या योजनेतून एकूण ७३ अब्ज डॉलरचा ओघ निर्माण झाला होता. अपेक्षित उद्दिष्ट लवकर पूर्ण झाल्याने ही योजना ३० सप्टेंबरऐवजी ३१ ऑगस्टलाच बंद करण्यात आली. मात्र, परकीय चलनाचा ओघ वाढविणे एवढ्याने रुपयावरील दबाव कायमचा दूर होत नाही, हे पुढील घडामोडींनी दाखवून दिले. सप्टेंबरच्या सुरुवातीला ७८५.७ अब्ज डॉलरच्या उच्चांकावर असलेला देशाचा परकीय चलनसाठा ऑक्टोबरच्या सुरुवातीला ७३४.६ अब्ज डॉलरपर्यंत घसरला. या घसरणीमागे रिझर्व्ह बँकेचे चलन बाजारातील हस्तक्षेप, सोन्याच्या साठ्याच्या मूल्यांकनातील बदल आणि अन्य घटक कारणीभूत होते. त्यामुळे संपूर्ण घट केवळ डॉलर विक्रीशी जोडणे योग्य ठरणार नाही. तरीही रुपयावरील दबाव कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागत असल्याचे या आकडेवारीतून दिसते.

रिझर्व्ह बँकेला चलनविषयक धोरण, व्याजदर आणि बाजारातील अस्थिरता नियंत्रित करण्यासाठी काही उपाय करता येतात. परंतु रोजगारनिर्मिती, उत्पादनवाढ, गुंतवणुकीला चालना, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि अर्थव्यवस्थेतील दीर्घकालीन सुधारणा यांसाठी केंद्र सरकारची भूमिका निर्णायक असते. जागतिक परिस्थिती प्रतिकूल असताना देशांतर्गत अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करणे अधिक महत्त्वाचे ठरते. केवळ तात्पुरत्या उपायांनी रुपयाला आधार मिळू शकतो; पण दीर्घकालीन स्थैर्यासाठी उत्पादनक्षमता आणि निर्यात वाढविण्याबरोबरच गुंतवणुकीसाठी विश्वासार्ह वातावरण निर्माण करावे लागेल. या आर्थिक परिस्थितीचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य कुटुंबांना आणि रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या तरुणांना बसू शकतो. अन्नधान्य, इंधन आणि दैनंदिन गरजांच्या वस्तू महाग झाल्या की मर्यादित उत्पन्नातील मोठा भाग खर्च होतो. त्याच वेळी पुरेशा रोजगारसंधी निर्माण झाल्या नाहीत, तर तरुणांच्या अस्वस्थतेत भर पडते. राजकीय आंदोलने नियंत्रणात आणणे हे सरकारसमोरील एक आव्हान असू शकते; परंतु अर्थव्यवस्थेतील ताण कमी करणे हे त्याहून व्यापक काम आहे. महागाईवर नियंत्रण, रोजगारनिर्मिती, गुंतवणुकीला चालना आणि नागरिकांच्या क्रयशक्तीचे संरक्षण यांना प्राधान्य द्यावे लागेल. अन्यथा राजकीय संघर्ष सुरूच राहतील आणि आर्थिक प्रश्न अधिक गंभीर होतील. आंदोलनाचे व्यासपीठ कितीही मर्यादित केले, तरी घरखर्चाचा ताण, नोकरीची अनिश्चितता आणि महागाईची झळ जनतेच्या आयुष्यातून नाहीशी होत नाही. त्यामुळे सरकारपुढील खरी कसोटी आंदोलन रोखण्याची नसून, सामान्यांच्या आर्थिक अस्वस्थतेची कारणे दूर करण्याची आहे.

# शिरूरमध्ये घरात घुसून गोळीबार; दोघे जखमी

## आनंद सोसायटीतील घटनेने नागरिकांमध्ये भीती

**शिरूर : हॅलो प्रभात**

शिरूर शहरातील आनंद सोसायटीत शुक्रवारी (दि. १६) पहाटे साडेचारच्या सुमारास अज्ञात चोरट्याने घरात घुसून पिस्तुलातून गोळीबार केल्याची घटना घडली. यामध्ये घरमालक उमेश चंदनमल छाजेड (वय ४३) गंभीर जखमी झाले असून, त्यांची १२ वर्षीय मुलगी मानवी हिच्याही हाताला दुखापत झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, अंदाजे २० ते २५ वर्षे वयाच्या चोरट्याने छाजेड यांच्या घरात प्रवेश करून त्यांच्या आईचा मोबाईल चोरला. घरातील हालचाल लक्षात आल्याने उमेश छाजेड यांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या डोक्याच्या दिशेने गोळी झाडल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

शेजारी अजित ओसवाल यांच्या घरातही चोरीचा प्रयत्न झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. गणेशोत्सवातील गोळीबारानंतर पुन्हा अशी घटना घडल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. परिसरात रात्रीची पोलीस गस्त वाढवण्याची मागणी होत आहे.

या प्रकरणी छाजेड यांच्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपीचा शोध सुरू असून पोलीस उपनिरीक्षक नकाते पुढील तपास करीत आहेत. आरोपीला तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# मंत्री गोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप



**इंदापूर : हॅलो प्रभात**

राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या वाढदिवसानिमित्त सावता परिषद महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने निमगाव केतकी येथील केतकेश्वर विद्यालयातील १०० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये स्कूल बॅग, बूट, गणवेश आणि वह्यांचा समावेश होता. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमासाठी राज्य कार्याध्यक्ष संतोष राजगुरू आणि तालुकाध्यक्ष प्रकाश नेवसे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते कृष्णाजी यादव होते. यावेळी पंचायत समितीचे सभापती दत्तात्रय शेंडे, साखर कारखान्याचे संचालक विजयराव हेगडे, प्राचार्य एम. बी. भोंग, पर्यवेक्षक जाधव, संदीप भोंग, राजू जठार, शंकर मिसाळ, भारत मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी सामाजिक उपक्रमांचे महत्त्व असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## घटस्थापनेला स्पिनीकडून १,३७० कार वितरित

**पुणे : हॅलो प्रभात**

वापरलेल्या कारच्या ऑनलाइन विक्रीसाठी प्रसिद्ध असलेल्या स्पिनी कंपनीने घटस्थापनेच्या दिवशी देशातील २४ शहरांमध्ये १,३७० कार वितरित करून एका दिवसातील सर्वाधिक डिलिव्हरीचा विक्रम नोंदवला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ९६ टक्के वाढ झाली असून, दर ४१ सेकंदांनी एका कारचे हस्तांतरण करण्यात आले. शहरनिहाय आकडेवारीत पुणे १८० कारसह आघाडीवर राहिले. मारुती सुझुकी बलेनोला सर्वाधिक पसंती मिळाली. त्यानंतर ग्रँड आय१०, क्विड, स्विफ्ट आणि टियागो या गाड्यांना मागणी होती.

# एसआयआर विरोधावरून रविंद्र चव्हाणांचा सवाल

**मुंबई : हॅलो प्रभात**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेला विरोध करणाऱ्या राजकीय पक्षांवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी टीका केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत मांडलेल्या भूमिकेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर शेअर करत त्यांनी विरोधकांना काही प्रश्न विचारले.

देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री कोण असावे, हे घुसखोरांनी ठरवावे का, असा सवाल चव्हाण यांनी उपस्थित केला. एका मतदाराला एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदान करण्याची मुभा असावी का, तसेच मृत व्यक्तींची नावे मतदार यादीत कायम ठेवावीत का, असे प्रश्नही त्यांनी विचारले.

एसआयआर प्रक्रियेला विरोध करणाऱ्या नेत्यांनी प्रथम या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यानंतर आपली भूमिका मांडावी, असे आवाहन चव्हाण यांनी केले. मतदार याद्यांच्या पुनरीक्षणावरून सुरू असलेल्या राजकीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही भूमिका व्यक्त केली आहे.

## ‘कम्प्लीट स्लाइडिंग केअर’ उपकरण लॉंच




**मुंबई : हॅलो प्रभात**

स्मॉल अप्लायन्सेस क्षेत्रातील इनाल्सा कंपनीने ‘कम्प्लीट स्लाइडिंग केअर’ हे टू-इन-वन स्टँडिंग गारमेंट स्टीमर आणि इस्त्री उपकरण बाजारात आणले आहे. भारतातील अशा प्रकारचे पहिले उपकरण असल्याचा दावा कंपनीने केला आहे. विविध प्रकारच्या कपड्यांना एकाच उपकरणातून इस्त्री आणि स्टीमिंगची सुविधा मिळणार आहे. या उपकरणात २५०० वॅटचा बॉयलर, सात तापमान पातळ्या आणि तीन स्टीम सेटिंग्स देण्यात आल्या आहेत. अवघ्या ४० सेकंदांत वापरासाठी सज्ज होणाऱ्या उपकरणात १.२ लिटरची पाण्याची टाकी आहे. इस्त्री बोर्ड विविध कोनांत फिरवण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

उपकरणाची मूळ किंमत २१,९९९ रुपये असून, सुरुवातीची ऑफर किंमत ११,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. दोन वर्षांची वॉरंटी मिळणार असून, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आणि प्रमुख दुकानांमध्ये विक्री सुरू आहे. ग्राहकांना कपड्यांच्या देखभालीसाठी एकाच उपकरणात विविध सुविधा देण्याचा उद्देश असल्याचे जितेंद्र चौहान यांनी सांगितले.

## फ्लॉरेन्सिया पॅरिसचे ‘फाइव्ह एलिमेंट्स’ कलेक्शन लॉन्च

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतीय फ्रेग्रन्स ब्रँड फ्लॉरेन्सिया पॅरिसने बॉलिवूड अभिनेत्री ईशा देओल यांच्या उपस्थितीत ‘फाइव्ह एलिमेंट्स’ या नवीन परफ्यूम कलेक्शनचे अनावरण केले.

अग्नी, पृथ्वी, जल, वायू आणि अवकाश या पंचतत्त्वांपासून प्रेरित पाच वेगवेगळे सुगंध यामध्ये सादर करण्यात आले आहेत. ग्राहकांचे व्यक्तिमत्त्व, मनःस्थिती आणि



आवडीनुसार सुगंध निवडण्याचा अनुभव देणे, हा या कलेक्शनचा उद्देश असल्याचे संस्थापक मानव सरीन यांनी सांगितले. ग्राहकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन हे परफ्यूम विकसित करण्यात आले आहेत.

कंपनीने ‘फ्लॉरेन्सिया सेंट रिच्युअल’ ही ऑनलाइन सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. यामध्ये जन्मतारखेच्या आधारे ग्राहकांना वैयक्तिक सुगंधांच्या शिफारसी दिल्या जातात. कलेक्शनमधील प्रत्येक परफ्यूम ५० मिलीच्या बाटलीत उपलब्ध असून, त्याची किंमत १,२४९ रुपये आहे. हे परफ्यूम कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर विक्रीसाठी उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली.

## सॅमसंगची ‘बिग, बिगर, बिगेस्ट’ मोहीम

**मुंबई : हॅलो प्रभात**

सॅमसंग इंडियाने मोठ्या स्क्रीनच्या टेलिव्हिजनसाठी ‘बिग, बिगर, बिगेस्ट’ मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेंतर्गत व्हिजन एआय तंत्रज्ञानयुक्त टीव्ही खरेदीवर ग्राहकांना विविध आकर्षक सवलती देण्यात येणार आहेत.

निवडक टीव्ही खरेदीवर १,१०,९९० रुपयांपर्यंतचा साउंडबार किंवा १,५९,९९० रुपयांपर्यंतचा व्हिजन एआय टीव्ही मोफत मिळण्याची संधी आहे. याशिवाय २० टक्क्यांपर्यंत कॅशबॅक, शून्य आगाऊ रक्कम आणि तीन वर्षांची वॉरंटी उपलब्ध आहे.

सॅमसंगचे व्हिजन एआय टीव्ही ३२ ते ११५ इंच आकारांमध्ये उपलब्ध आहेत. यामध्ये स्मार्ट फीचर्स, २०० हून अधिक मोफत स्ट्रीमिंग चॅनेल्स आणि सात वर्षांपर्यंत सॉफ्टवेअर अपडेट्सची सुविधा आहे. ग्राहकांना सणासुदीत उत्तम मनोरंजनाचा अनुभव देण्याचा उद्देश असल्याचे कंपनीचे उपाध्यक्ष विप्लेश डांग यांनी सांगितले.

## इलेक्ट्रिक ट्रकसाठी अदाणीची भागीदारी

**वापी : हॅलो प्रभात**

अदाणी लॉजिस्टिक्स लिमिटेडने जागतिक शिपिंग कंपनी सीएमए सीजीएमसोबत इलेक्ट्रिक ट्रकद्वारे कंटेनर वाहतुकीसाठी भागीदारी केली आहे. या अंतर्गत गुजरातमधील वापी येथील तुम्ब परिसरातील अंतर्देशीय कंटेनर डेपोमधून इलेक्ट्रिक ट्रकद्वारे मालवाहतूक केली जाणार आहे.

या उपक्रमामुळे डेपोमधील कंटेनर थेट ग्राहकांच्या कारखान्यांमध्ये आणि गोदामांमध्ये पोहोचवता येणार आहेत. उद्घाटनप्रसंगी कंपनीच्या कंटेनरची पहिली खेप या ट्रकद्वारे रवाना करण्यात आली.

या भागीदारीमुळे गुजरातमधील मालवाहतूक क्षेत्रात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढण्यास मदत होणार आहे. वाहतुकीसाठी आवश्यक चार्जिंग सुविधा, वाहनांची प्रवासक्षमता वरही भर दिला जाणार आहे.

## ‘जी१’ इलेक्ट्रिक स्कूटर लॉन्च

**मुंबई : हॅलो प्रभात**



ई-स्प्रिंटो कंपनीने कौटुंबिक वापरासाठी ‘जी१’ इलेक्ट्रिक स्कूटर बाजारात आणली आहे. कंपनीने या स्कूटरच्या माध्यमातून थेट ग्राहकांच्या बाजारपेठेत प्रवेश केला आहे. स्कूटरची सुरुवातीची किंमत ८९,९९९ रुपये असून, ती तीन बॅटरी पर्यायांमध्ये उपलब्ध आहे.

दोन किलोवॅट बॅटरी मॉडेलची किंमत ८९,९९९ रुपये, अडीच किलोवॅट मॉडेलची ९४,९९९ रुपये, तर तीन किलोवॅट मॉडेलची किंमत ९९,९९९ रुपये आहे. सर्व किंमती दिल्लीतील एक्स-शोरूम आहेत. स्कूटरची रेंज अनुक्रमे ८०, १०० आणि १३० किलोमीटर आहे.

चार रंगांमध्ये उपलब्ध असलेल्या स्कूटरची ग्राहकांना डिलिव्हरी १ जानेवारी २०२७ पासून सुरू होणार आहे. विक्रीपश्चात सेवा आणि डीलरशिप नेटवर्क विस्तारावर भर देणार असल्याचे सहसंस्थापक अतुल गुप्ता यांनी सांगितले.

## १५ हजार सिमेंटच्या गोण्यांतून साकारली दुर्गामातेची प्रतिमा



**कैमोर : हॅलो प्रभात**

नवरात्रोत्सव आणि दुर्गापूजेनिमित्त अदाणी सिमेंटने मध्य प्रदेशातील कैमोर येथील प्रकल्पात १५ हजार सिमेंटच्या गोण्यांमधून दुर्गामातेची भव्य प्रतिमा साकारली आहे. ‘जहाँ विश्वास, वहाँ शक्ति’ या अभियानांतर्गत हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला.

अंबुजा सिमेंट्स आणि एसीसीच्या गोण्यांचा वापर करून ७० बाय ७० फूट क्षेत्रात ही प्रतिमा तयार करण्यात आली. गोण्यांचे एकूण वजन ७५० टन असून, कलाकृतीसाठी १२ हजार ६०० तासांचे सामूहिक श्रमदान करण्यात आले.

जमिनीवरून स्वतंत्र दिसणाऱ्या सिमेंटच्या गोण्यांमधून आकाशातून पाहिल्यावर दुर्गामातेची दहा भुजांसह संपूर्ण प्रतिमा स्पष्ट दिसते.

या कलाकृतीची डिजिटल फिल्म कंपनीने समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केली आहे. एसीसीचा विश्वास आणि अंबुजा सिमेंट्सची मजबुती यांचा श्रद्धेशी संगम साधण्याचा प्रयत्न या अभियानातून करण्यात आला.

## आयसीआयसीआय लाइफकडून २० हजार महिलांना संधी

**मुंबई : हॅलो प्रभात**

आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्सने ‘नारीशक्ती’ उपक्रमांतर्गत आर्थिक वर्ष २०२६-२७ अखेरपर्यंत देशभरात २० हजार महिला विमा सल्लागारांची भरती करण्याची घोषणा केली आहे.

नवरात्रीच्या निमित्ताने महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. कंपनीकडे ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ७८ हजारांहून अधिक महिला विमा सल्लागार कार्यरत होत्या. एकूण विमा सल्लागारांमध्ये महिलांचे प्रमाण ३२ टक्के असून, विमा प्रतिनिधींमार्फत मिळणाऱ्या व्यवसायात त्यांचे योगदान ४५ टक्के आहे.

कंपनीने २०२४ मध्ये सुरू केलेल्या ‘नारीशक्ती’ उपक्रमातून महिलांना प्रशिक्षण आणि आवश्यक मार्गदर्शन दिले जाते. गृहिणी, नोकरदार तसेच व्यावसायिक महिलांना स्वतःच्या सोयीनुसार काम करण्याची संधी उपलब्ध आहे.

कंपनीच्या महिला सल्लागारांनी ‘एमडीआरटी’चे सदस्यत्व मिळवले आहे. महिलांच्या कौशल्यविकासाला प्राधान्य देणार असल्याचे मुख्य वितरण अधिकारी अमिश बँकर यांनी सांगितले.

## आयसीआयसीआय लाइफच्या नफ्यात २६.५ टक्के वाढ

**मुंबई : हॅलो प्रभात**

आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या सहामाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचा करपश्चात नफा २६.५ टक्क्यांनी वाढून ७६० कोटी रुपयांवर पोहोचला.

नवीन व्यवसायातून मिळणारा विमा हप्ता २५ टक्क्यांनी वाढून ११,८२१ कोटी रुपये झाला. नवीन व्यवसायाचे मूल्य २२.३ टक्क्यांनी वाढून १,२८३ कोटी रुपये झाले असून, नफ्याचे प्रमाण २६ टक्के राहिले. वैयक्तिक विमा संरक्षण व्यवसायात ४७.२ टक्के, तर ॲन्युइटी विभागात ५० टक्के वाढ नोंदवली गेली.

कंपनीने पहिल्या सहामाहीत ९९.३ टक्के विमा दावे निकाली काढले. मृत्यू दाव्यांपोटी २,६२७ कोटी रुपये वितरित केले. ग्राहककेंद्रित सेवा, व्यवसायवाढ आणि जोखीम व्यवस्थापनावर भर राहणार असल्याचे सिद्धार्थ मिश्रा यांनी सांगितले.

## कॉर्पोरेट क्षेत्रात ‘एक्सपिरियन्स डिझाइन’ला प्राधान्य

**पुणे : हॅलो प्रभात**

भारतातील कॉर्पोरेट कार्यालयांमध्ये केवळ भौतिक सुविधांऐवजी कर्मचाऱ्यांचा अनुभव, संस्थेची संस्कृती आणि सर्जनशील वातावरणाला प्राधान्य दिले जात आहे. सीबीआरईच्या २०२६ मधील पाहणीनुसार, ६५ टक्के कंपन्यांनी कार्यस्थळाचा अनुभव सुधारण्यासाठी ब्रँड आणि संस्कृतीवर आधारित डिझाइनला प्राधान्य दिले आहे.

या क्षेत्रात कार्यरत हॅपी स्पेसेस इंडिया या एक्सपिरियन्स डिझाइन स्टुडिओने दहा वर्षे पूर्ण केली आहेत. गणेश गडाख यांनी पल्लवी गडाख आणि अभय कुर्डुकर यांच्या सहकार्याने २०१६ मध्ये कंपनीची स्थापना केली.

कंपनीने आतापर्यंत १६ हून अधिक शहरांतील ७५ ठिकाणी २५ लाख चौरस फुटांपेक्षा अधिक क्षेत्रावर प्रकल्प साकारले आहेत. यामध्ये क्रिसिल, रोल्स-रॉयस, एसकेएफ आणि बंधन बँकेच्या कार्यालयांचा समावेश आहे.

## एचडीएफसी लाइफच्या नफ्यात १३ टक्के वाढ

**मुंबई : हॅलो प्रभात**

एचडीएफसी लाइफने आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या सहामाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचा करपश्चात नफा १३ टक्क्यांनी वाढून १,११९ कोटी रुपयांवर पोहोचला. नवीन व्यवसायाचे मूल्य १२ टक्क्यांनी वाढून २,०३७ कोटी रुपये झाले असून, मार्जिन २४.७ टक्के राहिले. दुसऱ्या तिमाहीत वैयक्तिक भारित प्राप्त प्रीमियममध्ये ११ टक्के वाढ झाली. ही वाढ खासगी विमा क्षेत्राच्या १० टक्के वाढीपेक्षा अधिक आहे. पहिल्या सहामाहीत वार्षिकीकृत प्रीमियम समतुल्यतेत ११ टक्के वाढ नोंदवली गेली.

कंपनीची व्यवस्थापनाखालील मालमत्ता ४.१ लाख कोटी रुपये, तर एम्बेडेड व्हॅल्यू ६६,४६१ कोटी रुपयांवर पोहोचली. वैयक्तिक संरक्षण विमा व्यवसायात ३३ टक्के वाढ झाली.

## पीएनबी मेटलाइफच्या इक्विटी फंडांना उच्च रेटिंग

**मुंबई : हॅलो प्रभात**

पीएनबी मेटलाइफ इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या युनिट लिंक्ड विमा योजनांमधील इक्विटी फंडांच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्तेपैकी ९९ टक्के मालमत्तांना मॉर्निंगस्टारकडून ४ किंवा ५ स्टार रेटिंग मिळाले आहे. ३१ मार्च २०२६ रोजीच्या मूल्यांकनानुसार पाच वर्षांतील जोखमीच्या तुलनेत फंडांच्या कामगिरीच्या आधारे हे मानांकन देण्यात आले. कंपनीच्या मिड-कॅप, मल्टी-कॅप आणि लार्ज-कॅप श्रेणीतील इक्विटी फंडांना उच्च मानांकन मिळाले आहे. संशोधनाधारित गुंतवणूक, शिस्तबद्ध धोरण आणि जोखीम व्यवस्थापनावर कंपनीचा भर असल्याचे सांगण्यात आले.

विमा संरक्षणासोबत युनिट लिंक्ड विमा योजनांतील परतावा बाजाराच्या कामगिरीवर अवलंबून असून गुंतवणुकीत जोखीम स्पष्ट करण्यात आले आहे.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय, ब्लॉक नं. ‘ए’, कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.
■ **मुंबई कार्यालय :** सी-५०३, निर्मल रेसिडेन्सी, कात्रप रोड, गणेश घाट, बदलापूर (पू), ठाणे - ४२१५०३ ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ **पुणे आवृत्ती संपादक : संजीव शाळगावकर** ■ **समूह संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर** ■ **संपर्क : 9011889001**